जाहीर उद्घोषणा
ई-लिलाव विक्री सूचना
अनमोल स्टील प्रोसेसर्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनातील)

परिसमापकाचा पत्ता: सीए कमल कुमार जादवानी, कार्यालय १०, सेंटर पॉईंट, १ला मजला, वल्र्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१ बिल्डिंग, कफ परेड, मुंबई, महाराष्ट्र ४००००५.
संपर्क क्र.: ७०४५५ ९४०३९ ईमेल आयडी: cirp.asppl@gmail.com

इन्सॉल्व्हन्सी अॅण्ड बँकरप्टसी कोड २०१६ च्या कलम ३५(१)(एफ) सहवाचता आयबीबीआय (लिक्विडेशन प्रोसेस) रेग्युलेशन्स, २०१६ च्या नियम ३३ ला अनुसरुन सूचना याद्वारे देण्यात येते की, परिसमापक खालील नमूद केलेल्या तपशीलांनुसार ई-लिलावामार्फत **''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'', ''जे काही आहे तेथे आहे'' आणि ''विना अवलंब तत्त्वाने''** कॉर्पोरेट कर्जदाराची मालमत्ता विकण्यासाठी प्रस्तावित आहेत.

मालमत्तेचा तपशील	
प्लॉट क्र. डी-११, गाव भागड औद्योगिक क्षेत्र, एमआयडीसी, विरचवाडी, माणगाव, जिल्हा रायगड, महाराष्ट्र-४१२२०८ येथे स्थित जमीन, ज्याचे जमीन क्षेत्र अंदाजे ३५,००० चौ. मी.	राखीव किंमत रू. २,७४,५०,०००/-
	ईएमडी :- रू. २७,४५,०००/-

टीप:
१. ई-लिलाव प्लॅटफॉर्म: https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home
२. लिलावाची तारीख आणि वेळ: १६ मे, २०२६ (स. ११:३० ते दु. १२:३०)
३. ईओआय आणि ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख: १४ मे, २०२६ सायं. ०७:०० वा. पर्यंत
४. बोली वाढ रक्कम: रू. १०,००,०००/-
५. मालमत्तेची तपासणी: परिसमापकाशी संपर्क साधून आगाऊ वेळ ठरविणे.

महत्त्वाच्या सूचना
१. संभाव्य बोलीदारांनी आयबीसी, २०१६च्या कलम २९ए अंतर्गत पात्रतेची पुष्टी करणारे हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.
२. इच्छुक पक्षकारांनी मालमत्ता आणि वैधानिक देयके याबाबत स्वतंत्रपणे तपासणी करणे आवश्यक आहे.
३. परिसमापकांनी स्टेकहोल्डर्सच्या सल्लागार समितीशी सल्लामसलत करून, निवडीच्या पसंतीच्या संदर्भात पूर्ण अधिकार राखून ठेवले आहेत. कृपया पुढील स्पष्टीकरणासाठी निविदा दस्तऐवजांचा संदर्भ घ्यावा.
४. परिसमापकांनी कोणतेही कारण न देता कोणतीही बोली किंवा प्रस्ताव रद्द करणे, सुधारणे किंवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.
५. हे स्पष्ट केले आहे की हे आमंत्रण संभाव्य बोलीदारांना आमंत्रित करण्याचा आहे आणि विक्री करण्यासाठी परिसमापक किंवा कंपनीकडून कोणत्याही प्रकारचे बंधनकारक बंधन निर्माण करत नाही. प्रक्रिया रद्द करण्याचा किंवा सुधारित करण्याचा आणि/किंवा कोणत्याही इच्छुक पक्ष/संभाव्य गुंतवणूकदार/बोलीदाराला कोणतेही कारण न देता आणि कोणतेही दायित्व न देता स्वीकारण्याचा आणि/किंवा अपात्र ठरवण्याचा अधिकार परिसमापकांनी राखून ठेवला आहे.
६. सदर विक्री सूचना ही ई-लिलाव विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्ती समाविष्ट निविदा दस्तऐवजासोबत cirp.asppl@gmail.com या ई-मेलद्वारे विनंती करून वाचणे आवश्यक आहे.
७. सर्व जोडपत्रासह ईओआय दस्तावेजांची सॉफ्ट कॉपी cirp.asppl@gmail.com वर मेल करणे अनिवार्य आहे.

सही/-
सीए कमल कुमार जादवानी
परिसमापक - अनमोल स्टील प्रोसेसर्स प्रायव्हेट लिमिटेड
आयबीबीआय नोंदणी क्र. : आयबीबीआय/पीए-००१/आयपी-पी-०२७८६/२०२२-२०२३/१४२५९
एएफए वैधता: ३०-०६-२०२६ पर्यंत
दिनांक: ३०-०४-२०२६ मोबाईल: ७०४५५ ९४०३९
ठिकाण: मुंबई ईमेल: cirp.asppl@gmail.com

बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

शिवाजी पार्क शाखा :- आराधना मंदिर सीएचएसएल, तळ मजला, लेडी जमशेदजी रोड, शिवाजी पार्क माहीम, मुंबई - ४०० ०१६ - भारत.
दूर : +९१ २२ २४४५२६१८/२४४५३२०६
ई मेल : Shibom@Bankofbaroda.com

कर्जदारांना सूचना

(सरफैसी ॲक्ट, २००२ च्या कलम १३ च्या पोट-कलम (२) अन्वये
ठिकाण: शिवाजी पार्क, मुंबई / दिनांक: २२.०४.२०२५

प्रति,
मे. ई-स्टार इन्फोटेक लि., १०५-१०५, ई स्टार हाऊस, बिल्डिंग क्र. २, सेक्टर क्र. ३, मिलेनियम बिझनेस पार्क, महापे, नवी मुंबई-४००७०९
श्री. महेश थानवी, जयमाला बंगलो, प्लॉट क्र. १२६-१३९, आरडीपी क्र. १, गोराई ब्रिज बस स्टॉपच्या मागे, गोराई, बोरीवली (प), मुंबई-४०००९१
महोदय,
संदर्भ. : आमच्या शिवाजी पार्क शाखेसह क्रेडिट सुविधा
आम्ही विविध पत सुविधांची मंजुरी व मंजुरीच्या शर्ती कळवणाऱ्या आमच्या पत्र क्र. **दिनांकित १८.०२.२००३** च्या संदर्भात देतो. वरील मंजुरीप्रमाणे तुम्ही येथे ह्यानंतर उल्लेख केल्याप्रमाणे तारण पुरविल्यानंतर पत सुविधा घेऊन त्यांचा उपयोग करण्यास सुरुवात केली. विविध कर्ज/क्रेडिट सुविधा खात्यांमधील सध्याची थकबाकी आणि अशा दायित्वासाठी बनविलेले तारण हितसंबंध खालीलप्रमाणे :

सुविधेचे स्वरूप आणि प्रकार	मर्यादा युएसडी मध्ये	व्याज दर	२८.१२.२००५ रोजीस थकबाकी
फॉरेन बँक गॅरंटी	**युएसडी ७.४० लाख**	सध्याच्या द. सा. १५.५ म्हणजेच वरील बीएलपीआर + २% दंडात्मक व्याज	**रु. ७०,८४,५३७/- अधिक लागू नसलेले व्याज**
तारण करारासह तारणाची संक्षिप्त माहिती (कृपया तारण करारांचे तपशील आणि तारण ठेवलेल्या मिळकतीचे क्षेत्र आणि सीमा नमूद कराव्यात): १०५-१०५, ई स्टार हाऊस, बिल्डिंग क्र. २, सेक्टर क्र. ३, मिलेनियम बिझनेस पार्क, महापे, नवी मुंबई-४००७०९ चे समतुल्य गहाण			
एकूण रक्कम	**रु. १००.०० लाख**		**रु. ९८,९५,६९०.११/- (+ लागू नसलेले व्याज)**

३. जसे की आपणास माहित आहे, आपण वरील कर्जे/थकबाकीवरील व्याजाच्या भरण्यात ३०.०६.२०२४ रोजी समाप्त झालेल्या तिमाहीपासून पुढे थकबाकी केली आहे आणि सध्याची देय रक्कम रु. ७०,८४,५३७/- असून ०१.०१.२००६ पासून पुढील व्याजासह देय आहे.
४. तुम्ही केलेल्या कसुरीच्या परिणामी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निर्देश आणि मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे ३०.०९.२००४ रोजीस तुमच्या कर्ज खात्याचे वर्गीकरण नॉन-परफॉर्मिंग ॲसेट असे करण्यात आले. आम्ही वारंवार विनंत्या आणि मागण्या करूनही तुम्ही त्यावरील व्याजासह थकीत कर्जाची परतफेड केलेली नाही.
५. वरील परिच्छेद १ मध्ये वर्णन केलेल्या वेगवेगळ्या तारणांनी रितसर सुरक्षित केलेल्या पत सुविधांच्या संबंधात तुमचे दायित्व निभावण्यातील तुमची असमर्थता आणि तुमच्या खात्याचे नॉन-परफॉर्मिंग ॲसेट म्हणून केलेले वर्गीकरण ध्यानात घेऊन, आम्ही याद्वारे तुम्हाला सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् अँड सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ च्या पोट-कलम (२) अन्वये तुम्हाला सूचना देत आहोत आणि तुम्हाला बँक ऑफ बडोदाद्वारे २८.१२.२००५ रोजीस पाठविलेल्या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांत वरील परिच्छेद १ मध्ये दिल्याप्रमाणे रु. ७०,८४,५३७.००+ ०१.०१.२००६ पासून द.सा. १५.५% दराने व्याज तसेच लागू न केलेले व्याज आणि इतर शुल्क वसूलीच्या तारखेपर्यंत असल्यास अशा एकूण रकमेचे बँकेप्रती तुमचे संपूर्ण दायित्व प्रदान करण्यास सांगत आहोत. आम्ही पुढे तुम्हाला सूचना देतो की, प्रदानाच्या तारखेपर्यंतच्या व्याजासह वरील रकमेचे प्रदान करण्यात तुम्ही कसूर केल्यास, आम्ही सदर ॲक्टच्या कलम १३ च्या पोट-कलम (४) अन्वये सर्व किंवा कोणतेही अधिकार वापरण्यास मोकळे असू, ह्याची कृपया नोंद घ्यावी.
६. कृपया ध्यानात ठेवावे की, संपूर्ण प्रदान होईपर्यंत प्रत्येक पत सुविधेसाठी वरील परिच्छेद १ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने व्याजाचे उपार्जन सुरू राहील.
७. आम्ही तुमचे लक्ष सदर ॲक्टच्या कलम १३ च्या पोट-कलम १३ कडे वेधत आहोत. ज्यानुसार तुम्हाला आमची लेखी पूर्वपरवानगी घेतल्याखेरीज विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे (नियमित कामकाजाव्यतिरिक्त अन्य मार्गाने) वरील परिच्छेद १ मध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही तारण मत्तेचे हस्तांतरण करण्यास प्रतिबंध केला आहे. आम्ही पुढे हेही कळवतो की, सदर ॲक्टच्या कलम १३(१३) मधील वरील तरतुदींचे पालन न करणे हा ॲक्टच्या कलम २९ अन्वये दंडनीय अपराध आहे.
८. **आम्ही पुढे तुमचे लक्ष सदरहू अधिनियमाच्या कलम १३ च्या पोटकलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे, ज्यानुसार तुम्ही खाजगीरित्या/प्रस्ताव/निविदा मागवून/जाहीर लिलावासाठी सूचना प्रकाशनाच्या तारखेपूर्वी कोणत्याही वेळी थकबाकीसह एकत्रित बँकेने केलेला सर्व परिव्यय, प्रभार आणि खर्चाची रक्कम तुम्ही भरणा केलीत तर तारण मत्ता विमोचित करू शकता. कृपया नोंद घ्यावी की, वरील नुसार सूचना प्रकाशित केल्यानंतर तारण मत्ता विमोचित करण्याचा तुम्हाला हक्क राहणार नाही.** कृपया ध्यानात ठेवावे की, ही मागणी सूचना, आम्हाला येणे असलेल्या रकमांच्या संबंधात पुढील मागण्या करण्याच्या अधिकारापुरत्या मर्यादित न राहता, त्याच्याहीसहीत असलेल्या उपाययोजना किंवा अन्य कोणत्याही अधिकारांना बाधा येऊ न देता दिली आहे व असे अधिकार त्यागले असे समजू नये.

आपले विश्वासू,
संजय कुमारी जी
मुख्य व्यवस्थापक - प्राधिकृत अधिकारी

---

punjab national bank ...the name you can BANK upon!

स्ट्रेस्ड ॲसेट मॅनेजमेंट शाखा, मुंबई
पीएनबी प्रगती टॉवर, १ला मजला, प्लॉट क्र. सी-९, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१, **ईमेल: zs8356@pnb.bank.in**

सरफैसी ॲक्ट अन्वये तारण मत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या परंतुकान्वये तारण मत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.
सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि गहाणदारांना याद्वारे सूचित करण्यात येते की, तारण धनकोंकडे गहाण ठेवलेल्या खाली वर्णन केलेल्या स्थावर मिळकती ज्यांचा प्रत्यक्ष कब्जा बँकेच्या/तारण धनकोंच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती मिळकत संबंधित कर्जदार आणि गहाणदारांकडून बँक/तारण धनकोंची देणी वसुल करण्यासाठी, जशी आहे तशी, जसे आहे तसे आणि जे काही आहे ते या तत्त्वावर **२६.०५.२०२६ रोजी स. ११:०० ते दु. ०४:०० या वेळेत,** आवश्यक असल्यास १० मिनिटांच्या मुदतवाढीसह विकली जाईल. राखीव किंमत आणि इसारा अनामत रक्कम खाली दिलेल्या सूचित संबंधित मिळकतींच्या समोर नमूद केलेले आहेत.

तारण मत्तांचे परिशिष्ट

अनु. क्र.	शाखेचे नाव / खात्याचे नाव / कर्जदार/हमीदार खात्याचे नाव आणि पत्ता	गहाण स्थावर मिळकतींचे वर्णन/मालकाचे नाव (मिळकती(तीं) चे गहाणदार)	ए) सरफैसी ॲक्ट २००२ चा १३(२) अन्वये मागणी सूचनेची तारीख बी) ३०.०६.२०१४ रोजीसची थकबाकी रक्कम सी) सरफैसी ॲक्ट, २००२ चा १३(४) अन्वये कब्जा तारीख डी) सांकेतिक/प्रत्यक्ष/ अन्वयिक कब्जाचा प्रकार	ए) राखीव किंमत (रु. लाखांत) बी) इअर (रक्कम रू. मध्ये) सी) बोली वाढविण्याची रक्कम	ई- लिलावाची तारीख /वेळ
१.	**स्ट्रेस्ड ॲसेट मॅनेजमेंट ब्रांच, मुंबई** **मे. दानिया ओरो ज्वेलरी प्रा. लि.** **पत्ता:** ६०१/६०२, ब्लॉक क्र. १, सीप्झ++, सीप्झ-सेझ, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००९६	फॅक्टरी युनिट क्र. ६०१/६०२, ६वा मजला, सीप्झ++, ब्लॉक क्र. १, प्रिमायसेस को-ऑप सोसायटी लि., अंधेरी पूर्व, मुंबई १२,८९०.४८ चौ. फूट. मालक / गहाणदार : मे. दानिया ओरो ज्वेलरी प्रा. लि.	ए) १२.०७.२०१६ बी) रु. २६.९२ कोटी अधिक त्यानंतरचे पुढील व्याज आणि प्रभार. सी) १६.०६.२०१७ डी) प्रत्यक्ष	ए) रु. १३,३१,३२,५००.०० बी) रु. १,३३,१३,२५०.०० सी) रु. ५,००,०००.००	२६.०५.२०२६ स. ११:०० ते दु. ४:००

तारण धनकोंना ज्ञात असलेल्या भारांचा तपशील - अधिकृत अधिकाऱ्यांच्या माहिती आणि ज्ञानानुसार, खाली नमूद केल्याप्रमाणे प्रभार अस्तित्वात आहेत.

अनु. क्र.	बाह्य प्रलंबित वैधानिक / नियामक देयकांचे वर्णन	संदर्भ	रक्कम
१	बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे देय असलेला मिळकत कर	सीप्झ पत्र क्र. सीप्झ-सेझ/ ई आणि आर/ डीओजे/७७/२०१८-१९/०७३०१/०९०२४ दिनांक ०५.०५.२०२२	रु. १,४३,५२,८०५.००
२	सर्वसाधारण देखभाल व सेवा शुल्क रु. १० प्रति चौ. फू. रु. ३,८६,७१४.०० प्रति महिना	चलन क्र. ०१२७ दिनांक ०७ फेब्रुवारी २०२६, सीप्झ ब्लॉक-१ प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. मार्च २०२६ पर्यंत (व्याज व जीएसटी सहित)	रु. ५,३७,७८,१६६.००
३	दुरुस्ती व देखभाल निधी (प्लंबिंग) -	सीप्झ ब्लॉक-१ प्रिमायसेस दिनांक ०५.०३.२०२६ च्या ईमेलनुसार	रु. ४,७८,००२.०० तसेच पाण्याच्या मीटर (२ नग) यांचे प्रत्यक्ष बिलांनुसार व्याज व देयके
४	०८.०२.२०२२ रोजीची प्रलंबित सरकारी भाडे देयके	सीप्झ अंधेरी (पूर्व) पत्र दिनांक १८.०२.२०२२	रु. ६४,११,५६२.४२

टीप: वरील नमूद भार पूर्ण आणि अंतिम नाहीत. भारांच्या पूर्ण व अंतिम रकमेकरिता इच्छुक खरेदीदारांनी सीप्झ, अंधेरी पूर्व, मुंबई येथे संपर्क साधावा.

अटी आणि शर्ती : विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ मधील विहित अटी आणि शर्ती आणि खालील पुढील अटींच्या अधीन राहील.
१. मिळकती **''जे आहे जेथे आहे तत्त्वाने'', ''जे आहे जसे आहे तत्त्वाने'' आणि ''जे काही आहे तेथे आहे तत्त्वाने''** विकण्यात येईल.
२. येथील वरील परिशिष्टात विनिर्दिष्ट तारण मत्तेचे तपशिल हे **प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या** योग्य माहितीनुसार नमुद केलेले आहेत, परंतु **प्राधिकृत अधिकारी** सदर उद्घोषणेतील कोणतीही चुक, चुकीचे विवरण किंवा वगळणे यासाठी उत्तरदायी राहणार नाहीत.
३. विक्री वरील कोष्टकातील नमूद तारीख आणि वेळी वेबसाईट: **https://Baanknet.com** येथे पुरविलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्म मार्फत निम्नस्वाक्षरीकारांद्वारे करण्यात येईल.
४. प्राधिकृत अधिकारींनी कोणताही कारण न देता कोणत्याही वेळी कोणतीही/सर्व बोली स्वीकारणे किंवा नाकारणे किंवा लिलाव पुढे **ढकलणे/रद्द करणे/तहकूब करणे/खंडीत करणे** अटी सुधारण्याचा हक्क राखून ठेवला आहे.
५. सर्व वैधानिक थकबाकी/अटेन्डट प्रभार/इतर थकबाकी सह नोंदणी प्रभार, मुद्रांक शुल्क, कर, वैधानिक दायित्वे, मिळकत कर थकबाकी, वीज थकबाकी इ. खरेदीदारांनी भरायची आहे. ६. मिळकती बँकेच्या प्रत्यक्ष कब्जात आहे.
७. विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तीकरिता कृपया **https://Baanknet.com & www.pnbindia.in** चा संदर्भ घ्यावा.

सही/-
दिनांक : २९.०४.२०२६ **(पी के भिसिकर)**
ठिकाण: मुंबई **मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी,**
पंजाब नॅशनल बँक, तारण धनको

सरफैसी ॲक्ट, २००२ अंतर्गत नियम ८(६) नुसार वैधानिक विक्री सूचना

Fusion Finance

फ्युजन फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय पत्ता: एच-१, सी ब्लॉक, कम्युनिटी सेंटर, नारायणा विहार, नवी दिल्ली - ११००२८, भारत
कॉर्पोरेट कार्यालय: प्लॉट क्र. ८६, इन्स्टीट्यूशनल सेक्टर ३२, गुरुग्राम, हरियाणा-१२२००१, भारत
सीआयएन: एल६५१००डीएल१९९२पीएलसी०६१२८७ | वेबसाईट: www.fusionfin.com

जाहीर सूचना

सर्वसामान्य जनता व आमच्या आदरणीय ग्राहकांना कळविण्यात येते की, त्यांच्या सोयीसाठी फ्युजन फायनान्स लिमिटेडची **भोकर एमएफआय शाखा** खाली नमूद केल्याप्रमाणे ३१/०७/२०२६ पासून कायमस्वरूपी स्थलांतरित/बंद करण्यात येणार आहे. ०१/०८/२०२६ पासून पुढे, भोकर एमएफआय शाखेतील सर्व ग्राहकांना अर्धापूर एमएफआय शाखेद्वारे सेवा पुरविण्यात येईल. ग्राहकांना खाली नमूद केलेल्या तारखेपासून पर्यायी शाखेत सेवा घेण्याची विनंती करण्यात येत आहे.

१. शाखेचे नाव व पत्ता (बंद होणारी)	फ्युजन फायनान्स लि., C/o श्री. सवाईसिंग रामसिंग शेखावत, सईद नगर जवळ, तमसा रोड, भोकर, नांदेड, महाराष्ट्र, पिन-४३१८०१.
२. पर्यायी शाखेचे नाव व पत्ता (पोर्टफोलिओ हस्तांतरित)	मे. फ्युजन फायनान्स लि., C/o श्री. वेंकटेश दत्ता पटवार, दुसरा मजला, स्टेट बँक ऑफ इंडिया समोर, तमसा रोड चौक, अर्धापूर, नांदेड, महाराष्ट्र, पिन-४३१६०४
स्थलांतर/स्थानांतर तारीख:	३१/०७/२०२६

आम्ही आमच्या ग्राहकांना खात्री देतो की या प्रक्रियेदरम्यान ग्राहकांना कोणतीही गैरसोय किंवा अडथळा होऊ नये; यासाठी कंपनी सर्व आवश्यक काळजी घेत आहे. भोकर एमएफआयचे सर्व विद्यमान एमएफआय कर्ज खाते, कोणत्याही अडथळ्याशिवाय अर्धापूर एमएफआयकडे हस्तांतरित करण्यात येतील. विद्यमान करारांच्या अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल होणार नाही. कोणत्याही स्पष्टीकरण किंवा मदतीसाठी, ग्राहक शाखा व्यवस्थापक किंवा कंपनीशी खालीलप्रमाणे संपर्क साधू शकतात.
टोल-फ्री क्रमांक (सकाळी ७:०० - ८:०० संध्या.): १८००१०३७८०८ | ईमेल आयडी: customercare@fusionfin.com
स्थळ: गुरुग्राम **फ्युजन फायनान्स लिमिटेड, सही/-, अधिकृत अधिकारी**

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, माझे अशिल मे. तुळशीकृपा को-ऑप. हौ. सोसायटी लि., जिचा रजिस्टर नं. टी.एन.ए./के.एल.एन./(टीसी)/४१४०/१२-१२-१९९० असून मौजे आयरे, प्लॉट नं. ४, सर्व्हे नं. ६२, हिस्सा नं. १/पैकी, नांदीवली रोड, आयरेगांव, डोंबिवली (पूर्व), ता. कल्याण, जि. ठाणे एकुण क्षेत्रफळ अंदाजे ५६० स्क्वे यार्ड म्हणजेच ४६८.४० स्क्वेमी. रस्ता रुंदीकरणानंतर (४३४ स्क्वे मी.) सदर इमारत ही कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीत येते. माझे अशिलांनी श्री. विजय कुमार देवळे आणि कंपनी, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०००६१ यांचेबरोबर दि. २२/१०/२०२२ रोजी पुर्नविकास करार व कधीही रद्द न होणारे कुलमुखत्यारपत्र केले होते. कुलमुखत्यारपत्र देवूनसुध्दा ऑक्टोबर-२०२२ पासून सोसायटी मिळकत विकासासाठी कुठलीही कामे करण्यास सदर कंपनी अयशस्वी झाली. आजपर्यंत माझे अशिलांनी सदर व्यक्ती/कंपनीबरोबर संपर्क करण्याचा प्रयत्न केला तरी आजपर्यंत सदर व्यक्ती/कंपनीने विकास कराराप्रमाणे इमारत पुर्नविकास करण्यासाठी कुठलीही पावले उचलली नाही. तरी माझे अशिलांनी दि. ०४/०१/२०२६ रोजी विशेष सर्वसाधारण सभेमध्ये ठराव पास करुन दि. २२/१०/२०२२ रोजी झालेला पुर्नविकास करार व कधीही रद्द न होणारे कुलमुखत्यारपत्र हे तात्काळ रद्द करण्यात आले आहे.
तरी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, माझे अशिल मे. तुळशीकृपा को-ऑप. हौ. सोसायटी हे श्री. विजयकुमार देवळे आणि कंपनी यांच्यासोबत केलेला दि. २२/१०/२०२२ रोजीचा पुर्नविकास करार व कधीही रद्द न होणारे कुलमुखत्यारपत्र हे दि. ०४/०१/२०२६ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये पारीत केलेल्या ठरावानुसार रद्द करण्यात येत आहे. सदर नोटीसदेवूनसुध्दा सदर विजयकुमार आणि कंपनीतर्फे जर कोणाही व्यक्ती, कंपनी, भागीदारीसंस्था, लिमिटेड कंपनी किंवा एखादी व्यक्ती हक्क, अधिकार दाखवून सदर जमीनीबाबत कुठलेही व्यवहार करण्याचा प्रयत्न करत असेल तर माझे अशिल कुठल्याही प्रकारच्या नुकसानीस जबाबदार नाही. सदर नोटीस ही माझ्या सही, शिक्यानिशी जाहीर करत आहे.

सही/-
दि. २५/०४/२०२६ **ॲड. हेमंत वि. पाठक**
मे. तुळशीकृपा को-ऑप. हौ. सोसायटी तर्फे
ऑफीस पत्ता : २रा मजला, पाठक बिल्डींग, डॉ. रघुवीरनगर, डॉ. आर. पी. रोड, डोंबिवली (पूर्व) मोबा. : ९८२१०७२५३८

फॉर्म जी

मुंबई आणि गुरगाव येथील
सुप्रिम अहमदनगर करमाळा टेंभुर्नी टोलवेज प्रायव्हेट लिमिटेड
करिता स्वारस्याच्या अभिव्यक्तीकरिता आमंत्रण
(इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (इन्सॉल्व्हन्सी रिझॉल्युशन प्रोसेस फॉर कॉर्पोरेट पसर्न्स), रेग्युलेशन २०१६ च्या रेग्युलेशन ३६ए च्या पोट-रेग्युलेशन (१)अंतर्गत)

संबंधित तपशिल

१.	पॅन आणि सीआयएन/एलएलपी नं. सहीत कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	**सुप्रिम अहमदनगर करमळा टेंभुर्नी टोलवेज प्रायव्हेट लिमिटेड** पॅन:AAPCS1881B सीआयएन: U45203HR2010PTC045531
२.	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता	५१०, ५वा मजला, एबीडब्ल्यू टॉवर, इफको चौक, एम. जी. रोड, गुरगाव, हरयाना-१२२००२.
३.	वेबसाईटची युआरएल	उपलब्ध नाही
४.	जास्तीत जास्त स्थावर मालमत्ता असलेल्या ठिकाणाचे तपशील	कंपनीची मौजे पाली, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथील जमिनीचा एक छोटा प्लॉट (२७२ चौ. मी.) वगळुन कोणतीही स्थिर मालमत्ता नाही.
५.	मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता	लागू नाही
६.	मागील आर्थिक वर्षात विकलेल्या मुख्य उत्पादने/ सेवांचे परिमाण आणि मूल्य	लागू नाही
७.	कर्मचारी/कामगारांची संख्या	शुन्य
८.	दोन वर्षांची शेवटची उपलब्ध वित्तीय विवरणे (अनुसूचींसह), धनकोंची सूची यासह पुढील तपशिल युआरएल येथे उपलब्ध.	सदर खालील ईमेल पत्ता: cirp.newbombay@resugemtrpl.com येथे विनंती पाठवुन रिझॉल्युशन प्रोफेशनल कडुन प्राप्त करता येईल.
९.	कोड च्या कलम २५(२) (एच) अंतर्गत निराकरण अर्जदारांसाठी पात्रता युआरएल येथे उपलब्ध	तपशिल येथे मेलद्वारे प्राप्त करता येईल sakt.cirp@gmail.com
१०	स्वारस्याची अभिव्यक्ती प्राप्त करण्यासाठी अंतिम तारीख	१५.०५.२०२६
११.	संभाव्य रिझॉल्युशन अर्जदारांची तात्पुरती सूची जारी करण्याची तारीख	२२.०५.२०२६
१२.	तात्पुरत्या सूचीला असलेले आक्षेप सादर करण्यासाठी अंतिम तारीख	२७.०५.२०२६
१३.	संभाव्य रिझॉल्युशन अर्जदारांची अंतिम सूची जारी करण्याची तारीख	०२.०६.२०२६
१४.	संभाव्य रिझॉल्युशन अर्जदारांकरिता माहितीलेख, इव्हॅल्युएशन मॅट्रिक्स आणि रिझॉल्युशन प्लॅनकरिता विनंती जारी करण्याची तारीख	०७.०६.२०२६
१५.	रिझॉल्युशन प्लान सादर करण्याची अंतिम तारीख	०७.०७.२०२६
१६.	स्वारस्याची अभिव्यक्ती सादर करण्यासाठी ईमेल प्रक्रिया	sakt.cirp@gmail.com
१७.	एमएसएमई म्हणुन कॉर्पोरेट कर्जदारांच्या नोंदणीचा तपशिल	होय, नोंदणी क्र. उद्यम-एचआर-०५-००१-००१३३६४ द्वारे एमएसएमई म्हणुन नोंदणीकृत आहे.

सुप्रिम अहमदनगर करमाळा टेंभुर्नी टोलवेज प्रायव्हेट लिमिटेड च्या प्रकरणातील
सही/-
राजेश झुनझुनवाल
मानीव रिझॉल्युशन प्रोफेशनल
दिनांक : ३०.०४.२०२६
ठिकाण : मुंबई आयबीबीआय/आयपीए-००३/आयपी-एन००४५७-सी०१/२०१७-२०१८/१११०२
एएफपी पर्यंत वैध ३१.१२.२०२६
ए५१, आशित सीएचएस, आझाद रोड, एच. बी. गावडे मार्ग, स्टॅनबर्ग इस्टेट, जुहू कोळीवाडा, मुंबई शहर, महाराष्ट्र- ४०००४९.

जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येते की, आम्ही **एक्स्टसी कन्स्ट्रक्शन्स प्रायव्हेट लिमिटेड**, (सीआयएन - U45203MH2010PTC201004), जिचा नोंदणीकृत पत्ता :- लॅनक्सेस हाऊस, दुसरा मजला, प्लॉट क्र.-ए-१६२/१६३/१६४, रस्ता क्र. २७, वागळे इस्टेट, एमआयडीसी, ठाणे पश्चिम, मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४००६०४ असा आहे, यांच्या यात याखाली लिहिलेल्या **परिशिष्टामध्ये** अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तांच्या संबंधातील हक्कविलेखांची चौकशी आणि पडताळणी करीत आहोत. (यात यानंतर **''मालमत्ता''** असा उल्लेख करण्यात आलेला आहे.)

सदर मालमत्तेच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या आणि/किंवा उपरोक्त हक्क विलेख दस्तऐवजांच्या संबंधातील विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, अभिहस्तांकन, गहाण, आकार, बोजा, धारणाधिकार, वारसा, मृत्युपत्रित देणगी, उत्तराधिकार, बक्षिस, परिरक्षा, सुविधाधिकार, न्यास, भाडेदारी, पोट-भाडेदारी, संमती नि परवानगी, काळजीवाहू तत्व, भोगवटा, कब्जा, कुटुंबव्यवस्था / तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, करार / करारनामे, विकास अधिकार, प्रकल्प व्यवस्थापन करारनामा, विकास व्यवस्थापन करारनामा, हक्क विलेख दस्तऐवज अनामत करण्याचे ज्ञापन, तारण किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणतेही दावे, आक्षेप, अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, आणि/किंवा मागणी असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने निम्नस्वाक्षरीकर्ता यांना या जाहिरातीच्या तारखेपासून १४ (चौदा दिवसांच्या) आत दस्तावेजी पुराव्यासह लेखी स्वरूपामध्ये ज्ञात होण्यासाठी कळविणे आवश्यक आहे. अन्यथा अशा प्रकारचा कोणताही अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा आणि/किंवा मागणी यांचा अधित्याग आणि/किंवा परित्याग करण्यात आल्याचे गृहीत धरण्यात येईल आणि अशा प्रकारचा कोणताही दावा अस्तित्वात नसल्याचे समजण्यात येईल.

यात यावर संदर्भित केलेले परिशिष्ट:

गाव भिलवले, तालुका खालापूर व जिल्हा रायगड येथील खालीलप्रमाणे सर्व्हे क्र. असलेल्या जमिनीचे ते सर्व तुकडे आणि भाग.

सर्व्हे क्रमांक	क्षेत्रफळ (चौरस मीटर मध्ये)	सर्व्हे क्रमांक	क्षेत्रफळ (चौरस मीटर मध्ये)	सर्व्हे क्र. क्रमांक	क्षेत्रफळ (चौरस मीटर मध्ये)
१८/२/२	१२,५००	१९/अ	१७,१११	२१/ब	२,४८२

आज दिनांक ३० एप्रिल, २०२६
करीता
LEXICON LAW PARTNERS ADVOCATES & SOLICITORS
सही/-
भागिदार
मुल्ला हाऊस, चौथा मजला,
५१, एम. जी. मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४००००१

प्रपत्र क्र. १६
[नियम ३४(३) पहा]

कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. २ मुंबई येथे

३रा मजला, कुलाबा, टेलिफोन भवन,